Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

E-Mail- secretary .stateboard @ gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : STD . (020)- 25651750

क्र.रा.म./परीक्षा-२/३५९७
पुणे-४११००४
दिनांक -२२/०६/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळ

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत संगणकप्रणाली Link उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ:-१)परिपत्रक क्र.रा.मं/परीक्षा-२/३३७१ दिनांक ९/६/२०२१
२) जा.क्र.रा.मं/परीक्षा-२/३३७२ दिनांक ९/६/२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित परिपत्रक व पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील, सूचना व वेळापत्रक निश्चित करुन त्याची कार्यपध्दती अवगत करण्यात आलेली आहे.

यासंदर्भात सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार संगणक प्रणालीमध्ये गुण भरण्यासाठी वेळापत्रकामध्ये दिनांक ११/६/२०२१ ते दिनांक ३०/६/२०२१ ही मुदत देण्यात आलेली होती. तथापि संगणकीय प्रणालीच्या ऑडीटचे काम अंतिम न झाल्यामुळे सदर कालावधीत संगणक प्रणाली सुरु करता आलेली नाही.

परंतु सदर संगणक प्रणालीचे ऑडीट पूर्ण झालेले असल्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी सुधारित मूल्यमापन कार्यपध्दतीनुसार संगणक प्रणालीमध्ये माहिती भरण्यासाठी दि.२३/६/२०२१ (सकाळी ११.३० पासून) ते दि.२/७/२०२१ हा कालावधी देण्यात येत आहे. तद्नंतर यासाठी सदर सुविधा उपलब्ध असणार नाही असे आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व माध्यमिक शाळा व मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच याबाबतच्या तांत्रिक सूचना व कालावधीचा तपशील मंडळाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे.

**क्र.कोविमं/माध्य.गोप./433/दिनांक २३/६/२०२१**

**प्रति,**

**मुख्याध्यापक**
**सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा**
**सातारा/सांगली/कोल्हापूर**

**वरील सुचनांची नोंद घेवून पुढील कार्यवाही करावी.**

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**